CMYK

मेहकरात ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकाऱ्यांना लॅपटॉप व प्रिंटर चे वाटप >> पान 2


मायेची सावली देणाऱ्या दोन वृक्षाची अवैध कत्तल >> पान 3

लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाले मुलाच्या खात्यावर; आई, मुलाने दाखवला प्रामाणिकपणा शासनाला पैसे केले परत >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

सुविचार
नम्रता माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा देते.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



किआरा अडवाणी हॉस्पिटलाइज्ड्च्या घोषणेनं चाहते चिंतेत
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 144 ■ रविवार, दि. 05 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## संतोष देशमुख हत्या प्रकरणी सुदर्शन घुलेसह तिन्ही आरोपींना १४ दिवसांची सीआयडी कोठडी

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी ताब्यात घेण्यात आलेल्या सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि सिद्धार्थ सोनवणे या तीनही आरोपींना १४ दिवसांची सीआयडी कोठडी देण्यात आली आहे. केज न्यायालयाचे प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी एस व्ही पावसकर यांनी ही शिक्षा सुनावली आहे. या तीनही आरोपींना २५ दिवसांनंतर अटक करण्यात आली आहे.

मस्सोजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या पंचवीस दिवसानंतर, तीन मुख्य आरोपींना अटक करण्यात यश आलं आहे. फरार असलेला मुख्य आरोपी सुदर्शन घुलेसह सुधीर सांगळेच्या मुसक्या एसआयटीच्या पथकाने बालेवाडीत आवळल्या. अद्याप या प्रकरणातील आणखी एक आरोपी कृष्णा आंधळे मात्र फरार आहे.

आरोपींना मदत करणाऱ्या डॉ. संभाजी वायभसेंनाही पोलिसांनी ताब्यात घेतलंय. त्याच्याच चौकशीत या आरोपींचा ठावठिकाणा कळाल्याचं सांगण्यात येतंय. या दोन मुख्य आरोपींसह, हत्येच्या दिवशी सरपंचाचा ठावठिकाणा दिल्याच्या संशयाखाली कल्याणमधून सिद्धार्थ सोनवणेला ताब्यात घेतलं





आहे. सिद्धार्थ सोनवणे हा मस्साजोगचाच रहिवासी आहे. सरपंचाची हत्या झाल्यानंतर तो गावातच होता. याशिवाय अंत्यविधीला देखील तो उपस्थित होता.

या प्रकरणातील संशयित आरोपींना ज्या व्यक्तीने पळून जाण्यासाठी मदत केली, ज्यांच्या संपर्कात हे तीनही लोक होते त्यांच्याकडून पोलिसांना माहिती मिळाली. पोलिसांनी आणि स्पेशल टीमने त्या माहितीच्या आधारे सुदर्शन घुलेसह सुधीर सांगळेला अटक केली. या दोघांना पुण्यातून अटक करण्यात आली आहे. तर संतोष देशमुखांचा ठावठिकाणा सांगणारा तिसरा आरोपी सिद्धार्थ सोनवणेला कल्याणमधून ताब्यात घेण्यात आलं.

मुख्यमंत्र्यांनी देखील या प्रकरणाची दखल घेतली आणि तपास करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याचबरोबर या प्रकरणातील आरोपींना पकडण्यासाठी टेक्निकल टीम तयार करून या आरोपींच्या मोबाईलचे लोकेशन आणि ते ज्या लोकांच्या संपर्कात होते त्यांच्या चौकशीनंतर काही माहिती मिळवली. या तीन आरोपींनी आपले मोबाईल फोन बंद ठेवले होते. नवीन सिम कार्ड घेतले होते. पण त्यांच्या नेटवर्कच्या माध्यमातून त्यांची माहिती मिळाली आणि त्या आधारे यांना अटक केली. या प्रकरणातील आणखी एक आरोपी कृष्णा आंधळे हा फरार आहे.

## अणुशास्त्रज्ञ आर. चिदंबरम यांचे निधन!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ातील ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ राजगोपाल चिदंबरम यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते. चिदंबरम यांनी पहाटे ३ वाजून २० मिनिटांच्या सुमारास मुंबईच्या जसलोक रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. त्यांनी अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष आणि भारत सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम केले. चिदंबरम यांना १९७५ आणि १९९९ मध्ये पद्मश्री आणि पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

गेल्या काही दिवसांपासून चिदंबरम यांची प्रकृती ठीक नव्हती. शास्त्रज्ञ म्हणून डॉ. चिदंबरम यांनी भाभा अणु संशोधन केंद्राचे संचालक, अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष आणि अणुऊर्जा विभागाचे सचिव म्हणून काम केले होते. तसेच १९९४–९५ दरम्यान आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सीच्या संचालक मंडळाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. डॉ. चिदंबरम हे भारत सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागारही होते. डॉ. चिदंबरम यांनी भारताच्या अण्वस्त्र कार्यक्रमात महत्त्वाची भूमिका बजावली – पोखरण– (१९७५) आणि पोखरण–२ (१९९८) च्या चाचणी तयारीचे आयोजन.

अणुऊर्जेच्या शांततापूर्ण वापराचे समर्थक, त्यांनी भारताच्या अणुऊर्जा कार्यक्रमाचे नेतृत्व केले. डॉ. चिदंबरम यांना पद्मश्री (१९७५) आणि पद्मविभूषण (१९९९) यांच्यासह अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

## 'मरे'च्या आरपीएफ टीमने वाचवले व्यक्तीचे प्राण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कसारा येथील मध्य रेल्वेच्या आरपीएफ टीमने एका व्यक्तीचे प्राण वाचवण्यात, अतुलनीय टीमवर्क, समर्पण आणि माणुसकी दाखवून महत्त्वाची भूमिका बजावली. कसारा येथील आरपीएफ पोस्टला अंकित गर्ग, वरिष्ठ विभाग अभियंतापर्मनंट वे यांच्याकडून रेल्वे रुळांच्या बाजूने ११०४२ या पोल क्रमांकाजवळ कोणीतरी पडल्याचा संदेश प्राप्त झाला.

आरपीएफचे उपनिरीक्षक राम लखन कुमार त्यांच्या टीम सह तत्काळ घटनास्थळी पोहोचले आणि त्यांना एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. टीमने त्वरीत कारवाई करून त्या व्यक्तीला जवळच्या रुग्णालयात नेले जेथे त्याला पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले. आवश्यक औपचारिकता पूर्ण केल्यानंतर, त्याच्या बॅगेची नियमित तपासणी केली असता त्या व्यक्तीचे नाव सोमनाथ एकनाथ शिंदे, इगतपुरी येथील रहिवासी आणि भांडुप युनिट क्रमांक १, ट्रॅक मेंटेनर म्हणून कार्यरत असलेले रेल्वे कर्मचारी असल्याचे उघड झाले.

शिंदे यांनी तपास पथकाला माहिती दिली की, तो ड्युटीवरून घरी परतत असताना उंबरमाळी येथे उतरला होता आणि महामार्गावर उभा असताना त्याला अज्ञात व्यक्तींनी बेदम मारहाण करून लुटले, त्यानंतर त्यांनी त्याला रेल्वे रुळालगतच्या खांबाजवळ फेकून दिले. वैद्यकीय चाचण्यांमध्ये त्याला अंतर्गत जखमा आढळून आल्या आणि त्यानुसार त्याच्या कुटुंबीयांना माहिती देण्यात आली. उपनिरीक्षक राम लखन कुमार, हेड कॉन्स्टेबल संतोष बागुल आणि अधिकृत वाहन चालक महिपाल पंडित यांचा समावेश असलेल्या ींझइ च्या टीमने एकाचा जीव वाचवण्याचे कौतुकास्पद काम केले आहे. आरपीएफ टीम ''जीवन रक्षक'' या बिरुदावलीस पात्र ठरली आहे.

## धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावरून अजितदादांवर दबाव वाढला, पक्षाचाच आमदार म्हणाला, 'मंत्रिपदावर...'

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात दररोज नवनवीन धागेदोरे समोर येत आहेत. त्यात आता देशमुख हत्या प्रकरणात फरार असलेल्या आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटक करण्यात आली आहे. या अटकेनंतर आता अजित पवारांच्या आमदाराने मंत्रिपदावरून धनंजय मुंडे यांनी राहु नये,अशी मागणी केली. विशेष म्हणजेच याच आमदाराने बीडच्या मोर्चात देखील अशीच मागणी केली होती.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंके बोलत होते.यावेळी बोलताना ते म्हणाले की, संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास होईपर्यंत धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदावर राहु नये, अशी आमची मागणी असल्याचे अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंखे यांनी सांगितले आहे. आम्हाला आमच्या पक्षश्रेष्ठींना देखील तेच सांगायचे आहे की त्यांना मंत्रिपदावर ठेवू नका. पक्षपातीपणे चौकशी होऊ द्या, असे सोळंके यांनी सांगितले आहे.

प्रकाश सोळंके यांनी पालकमंत्रिपदावरही मोठं भाष्य केलं आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री या जिल्ह्यातील सध्याची परिस्थिती,जातीय सलोखा बिघडलेला आहे त्यामुळे या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद अजित पवारांनी आणि देवेंद्र फडणवीसांनी स्वत:कडे घ्याव,असे सोळंके यांनी म्हटलं आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुदर्शन घुले प्रमुख आरोपी आहे तर सुधीर सांगळे हा सहआरोपी आहेत.या दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. खरं तर सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे हे दोन दिवस भिवंडीमध्ये होते. सरपंचाची हत्या केल्यानंतर तब्बल २५ दिवसांनी हे आरोपी फरारी होते. अखेर त्या तीन फरार आरोपींपैकी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळेला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

## संतोष देशमुख हत्याकांड; परभणीत हजारो नागरिकांचा मोर्चात सहभाग, मनोज जरांगेंचा सरकारवर हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. या हत्येच्या निषेधार्थ आज परभणी इथं मूक मोर्चाचं आयोजन करण्यात आलं आहे. परभणी इथं काढण्यात आलेल्या मूक मोर्चात मराठा आंदोलक मनोज जरांगे, ज्योती मेटे आदींसह देशमुख कुटुंबीय सहभागी झाले आहेत. नागरिकांनी मोर्चात मोठी गर्दी केली आहे. यावेळी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी या आरोपींच्या नार्को टेस्टची मागणी केली आहे.



संतोष देशमुख यांना न्याय मिळण्यासाठी परभणीत मूक मोर्चा : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आज सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ परभणीत आज सर्वपक्षीय नेत्यांकडून मूक मोर्चाचं आयोजन करण्यात आलं आहे. या मूक मोर्चात हजारो नागरिकांनी सहभाग घेतला आहे. या मोर्चात मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी ''पकडण्यात आलेल्या आरोपींची नार्को टेस्ट करावी. या आरोपींना कोणी पाठीमागे लपवलं, त्यांच्यावर हत्येत सहभागी असल्याचा गुन्हा दाखल करावा,'' अशी मागणी केली.

आरोपींच्या मागे कोण हेही स्पष्ट होईल – धनंजय देशमुख : संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपी एका मागून एक पुण्यातून अटक होत आहेत. त्या ठिकाणी त्यांना कुणीतरी अभय देत होतं. त्यांच्या मागे कोणीतरी आहे आणि आता आरोपी अटक होत असल्यानं त्यांच्या तपासात या प्रकरणामागे कोण आहे हेही स्पष्ट होईल, असा विश्वास संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी व्यक्त केला आहे. आज ४ जानेवारी रोजी परभणीत सर्वपक्षीय काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान संतोष देशमुख बोलत होते. परभणी शहरातील मुख्य रस्त्यानं संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ प्रचंड मोठा मोर्चा काढण्यात आला. यावेळी पुढं बोलताना धनंजय देशमुख यांनी आम्ही एका विकृती विरुद्ध लढत आहोत असं सांगितलं. आजच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील २ फरार आरोपींना पुण्यातून ताब्यात घेण्यात आले आहे. आता राहिलेल्या एका आरोपीला देखील पकडावं, असं धनंजय देशमुखांनी म्हटलं. आरोपींवर मोक्का लावलाच पाहिजे ही आमची प्रमुख मागणी असल्याचंही ते म्हणाले.

## विधानपरिषद सभापती राम शिंदेंच्या सत्कार सोहळ्याकडे भाजपच्याच नेत्यांनी फिरवली पाठ; चर्चांना उधाण

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आज चौथ्या दिवशी विधानपरिषदेत भाजपचे आमदार राम शिंदे यांची विधानपरिषद सभापतीपदी एकमताने निवड करण्यात आली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत सर्व नेत्यांनी राम शिंदे यांच्यावर ही जबाबदारी सोपवली. यानंतर आज अहिल्यानगर शहरात विधानपरिषदेच्या सभापतीपदी राम शिंदे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सर्वपक्षीय सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. मात्र या सत्कार सोहळ्याकडे भाजपच्याच नेत्यांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

अहिल्यानगर शहरातील माऊली सभागृहात राम शिंदे यांचा सर्वपक्षीय सत्कार सोहळा पार पडला. या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे होते.

## नवऱ्याचे व्हॉटसअ‍ॅप उघडताच हादरली महिला पोलीस, पतीबाबत नको तेच कळाले, गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यातील बाळापूरमध्ये एक विचित्र घटना घडली आहे. इथे एका महिला पोलिसानं आपल्या पतीचं व्हॉट्सअ‍ॅप चेक केल्यानंतर तिला नको तेच दिसून आलं आहे. या प्रकारानंतर महिलेनं थेट पोलीस ठाणं गाठत नवऱ्यासह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकारामुळे महिला पोलिसाला चांगलाच मानसिक धक्का बसला आहे. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास केला जात आहे.

नेमकं प्रकरण काय?

अकोला जिल्ह्यातील बाळापूर येथील रहिवासी असणाऱ्या एका महिला पोलिसानं नुकतंच बाळापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. आपला पती समलिंगी आहे, त्याने आपल्यापासून ही बाब लपवली. तसेच सासरच्या मंडळींकडून आपल्याला जाच केला जात आहे, अशी तक्रार महिला पोलिसानं केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी सासरच्या पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पीडित महिला पोलिसाचा अडीच वर्षापासून बार्शी टाकळी तालुक्यातील एका गावातल्या युवकासोबत लग्न झालं होतं. लग्नाला काही दिवस उलटले नाहीत, तोपर्यंत आरोपींनी माहिलेला जाच करायला सुरुवात केली. सासरच्यांनी घर दुरुस्तीसाठी १ लाख आणि शेतीवरील कर्ज फेडण्यासाठी दोन लाख घेतले, अजूनही पाच लाखांची मागणी करत असल्याचं महिलेनं तक्रारीत म्हटलं आहे. एवढंच नव्हे तर आपला पती समलिंगी असल्याचा दावाही तिने केला.

खरं तर, लग्नानंतर सासरी जाच होत असल्याने पीडित महिला आपल्या पतीसह अकोला शहरातील पोलीस वसाहतीत वास्तव्याला होता. घटनेच्या दिवशी तिच्या पतीने मोबाइल चार्जिंगला लावला होता. यावेळी महिलेनं आपल्या पतीचा मोबाईल चेक केला. व्हॉट्सअ‍ॅपवरील पतीचे मेसेज बघून तिच्या पायाखालची जमीनच सरकली. त्याचे त्याच्या मित्रांसोबत आक्षेपार्ह संभाषण आढळून आले. याबाबत महिलेनं जाब विचारला असता आपण समलिंगी असल्याचा आणि इतर पुरुषांसोबत संबंध असल्याचं पतीनं कबुल केलं. ही बाब समजल्यानंतर महिलेनं बाळापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पतीने केवळ पैशांसाठी आपल्याशी लग्न केले, याची कबुली स्वत: पतीने दिल्याचेही महिलेने तक्रारीत सांगितले आहे. याप्रकरणी पोलिसांनी पतीसह सासरच्या पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास केला जात आहे.

## शिक्षकांवरील निवडणुका आणि सर्व्हेंचा अतिरिक्त ताण कमी करणार

दैनिक आपला विदर्भ

### शिक्षणमंत्री दादा भुसेंचं आश्वासन

**मुंबई/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या पाठीवरचं ओझं कमी करण्याबरोबर शिक्षकांवर शाळा व्यतिरिक्त कामाचा भारदेखील कमी करण्याचा संकल्प राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केला आहे. शिक्षकांना शाळा व्यतिरिक्त निवडणुका आणि इतर कामांचाही ताण असतो. त्यावरून शिक्षक वर्गात नाराजीचा सूर आहे. त्यामुळे शिक्षकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी मंत्री दादा भुसेंनी शिक्षक आणि अधिकाऱ्याची बैठक बोलावली होती.

शिक्षकांसोबत झालेल्या बैठकीत विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांवरील असलेलं अतिरिक्त कामाचं ओझंही कमी करण्याचं आश्र्वासन दादा भुसेंनी दिलं. शिक्षकांकडे निवडणुका, शासकीय सर्व्हे आणि इतर कामे दिली जातात. त्यावरून राज्यातील शिक्षकांमध्ये नाराजीचा सूर असतो. त्यावर काय उपाययोजना करता येतील याचा आढावा दादा भुसे यांनी घेतला.

दरम्यान, लवकरच शिक्षक संघटनांसोबत चर्चा करून त्यांची पेंशनवर तोडगा काढला जाईल तसेच त्यांची शाळा व्यतिरिक्त कामे कमी करण्यासंदर्भात चर्चा करण्यात येणार आहे.

राज्याचे नवनियुक्त शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी राज्याच्या शिक्षण विभागाचा रोड मॅप तयार करण्यात येणार असल्याचं सांगितलं. विद्यार्थी, पालक, शिक्षक सर्वांशी चर्चा करून प्राधान्यक्रम ठरविणार आहे. नाशिक जिल्ह्यात आदर्श शाळांची संख्या २०० च्या वर आहे. स्वच्छता गृह, शाळा दुरुस्ती, ई – शाळा सुरू करणे, असे अनेक उपक्रम राबवणार असल्याची माहिती दादा भुसे यांनी दिली.



ज्या संवेदनेने त्यांनी शिक्षण विभागाची जबाबदारी माझ्याजवळ दिली आहे, हे एक मोठं आव्हानात्मक काम आहे. परंतु सर्व विभाग झपाटून काम करेल. सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्याला केंद्रबिंदू मानून आम्ही येणाऱ्या काळात चांगल्यात चांगले काम करून दाखवण्याचा प्रयत्न करू असं दादा भुसे यांनी म्हटलंय.

या विभागात रिझल्ट ओरिएंटेड काम दिसेल. शालेय शिक्षण मंत्री यापुढे तुम्हाला गाव खेड्यांमध्ये शाळांमध्ये व्हिजिट करणारे दिसतील. शिक्षण विभाग देखील शाळेच्या दारी यापुढे नक्कीच दिसेल. एकंदरीत गरिबातील गरीब विद्यार्थ्याला चांगलं शिक्षण मिळवण्याचा प्रयत्न आपण सर्व मिळून करू, असेही दादा भुसे म्हणाले.

CMYK

# मेहकरात ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकाऱ्यांना लॅपटॉप व प्रिंटर चे वाटप

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर तहसील प्रशासकीय ईमारत येथे आज आमदार सिध्दार्थ खरात यांच्या हस्ते ७० कर्मचाऱ्यांना लॅपटॉप व प्रिंटर वाटप झाले.

केंद्र आणि राज्य शासनाने प्रशासकीय कामकाजात गती आणण्यासाठी ई-गव्हर्नन्स उपक्रमाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आले आहेत. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यामधील एकूण १३ तालुक्यातील कार्यरत ५०४ महसूल अधिकारी व ८९ मंडळ अधिकारी असे एकूण ५९३ जणांना लॅपटॉप व ५९३ प्रिंटर शासनाने उपलब्ध करून दिले असून आज मेहकर तहसिल प्रशासकीय इमारत खंडाळा येथे मेहकर तालुक्यातील १० मंडळ अधिकारी व ६० ग्राम महसूल अधिकारी यांना आमदार सिद्धार्थ खरात यांचे हस्ते लॅपटॉप व प्रिंटर वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला तहसीलदार निलेश मडके , अजय पिंपरकर (नायब तहसीलदार), विदर्भ पटवारी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष विजेंद्र धोंडगे, उबाठा गटाचे शहर अध्यक्ष किशोर गारोळे,युवा सेनेचे तालुका अधिकारी आकाश घोडे,अँड संदीप गवई ,रा.काँ.तालुका अध्यक्ष दत्ता पाटील घनवट ,तालुका पटवारी कार्यकारणी मेहकर व सर्व मंडळ अधिकारी तालुका मेहकर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्र संचालन गणेश बाजड, यांनी केले व कार्यक्रमाचे नियोजन ग्राम महसूल अधिकारी राजू निकस यांनी केले.




ई-गव्हर्नन्स डिजिटल इंडिया कार्यक्रमांतर्गत लँड रेकॉर्ड मॉडर्नायझेशन प्रोग्रॅम अंतर्गत जमाबंदी आयुक्त कार्यालय पुणे व जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे मान्यतेने साहित्याचे वाटप करण्यात आले आहे.

## पाकिस्तान - तालिबान संघर्ष वाढला

पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात तालिबानचे सरकार भारताशी समोरासमोर युद्ध करणे शक्य नसल्याने पाकिस्तानने दहशतवादाला खतपाणी घालून भारतात अराजकता माजवण्याचा प्रयत्न केला. विशेषतः जम्मू काश्मीर मध्ये त्यांनी दहशतवाद्यांना हाताशी धरून जम्मू काश्मीर कायम अस्थिर करण्याचा प्रयत्न केला. भारताशी लढण्यासाठी ज्या दहशतवादाचा पाकिस्तानने शस्त्र म्हणून वापर केला तेच दहशतवादाचे शस्त्र आता त्यांच्यावर बुमरांग होत आहे. तालिबान ही दहशतवादी संघटना आहे हे सर्व जगाने मान्य केले आहे. ज्या वेळी तालिबानने अफगाणिस्तानवर कब्जा मिळवला त्यावेळी जगातील बहुतेक देशांनी तालिबानच्या सरकारला मान्यता देण्यास नकार दिला मात्र पाकिस्तानने तालिबानला सुरवातीपासूनच समर्थन दिले. अफगाणिस्तानातील तालिबानी सरकारला मान्यता देणारा पाकिस्तान हा जगातील पहिला देश होता अर्थात त्यामागे त्यांचा वेगळा डाव होता. तालिबानला मान्यता दिल्यास तालिबानला सोबत घेऊन भारतात घुसखोरी करून भारतात अस्थिरता माजवता येईल तसेच जर भविष्यात भारताविरुद्ध लढाई झाली तर त्यात तालिबानची मदत घेता येईल हा पाकिस्तानचा डाव होता. आज मात्र त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला असून तालिबानने भारताशी पंगा न घेता पाकिस्तानशीच पंगा घेत पाकिस्तानातच घुसखोरी सुरू केली. मागील वर्षी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान सीमेवर प्रचंड तणाव निर्माण झाला होता. तालिबानने पाकिस्तानी हद्दीत प्रवेश करून पाकिस्तानच्या सीमावर्ती भागातील एका जिल्ह्यात सरकार स्थापन केले होते. याची कबुली खैबर पखतूनच्या राज्यपालांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली होती. पाकिस्तानच्या हातून हा भाग निघून गेल्याने पाकिस्तानमध्ये खळबळ माजली होती. हा होता या दोन्ही देशातील तणावाचा पहिला अंक. आता दोन्ही देशातील तणावाचा दुसरा अंक सुरू झाला आहे. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या सीमावर्ती भागात हवाई हल्ले करून २ डझनाहून अधिक तालीबानिंना ठार केले. पाकिस्तानच्या या हवाई हल्ल्याला तालिबानने ही जशास तसे उत्तर दिले. अफगाणिस्तानने पाक अफगाण सीमेवर तैनात असलेल्या १९ पाकिस्तानी रेंजर्सला ठार केले इतकेच नाही तर अफगाणिस्तानने पाकिस्तानच्या २ चौक्यांवर देखील ताबा मिळवला. यावरून हे स्पष्ट झाले की आता पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात युद्ध सुरू झाले आहे. हा संघर्ष नजीकच्या काळात थांबेल असे वाटत नाही उलट वाढतच जाईल. पाकिस्तानने अफगाणिस्तानला कमी लेखून मोठी चूक केली आहे. पाकिस्तानकडे अत्याधुनिक शस्त्रसाठा आणि अफगाणिस्तानपेक्षा कैक पट अधिक सैन्य आहे. अफगाणिस्तानकडे आजही जुनेच शस्त्र असून त्यांची सैन्य संख्याही कमी आहे असे असले तरी तालिबानी सैन्याकडे जी जिद्द आहे ती पाकिस्तानी सैन्याकडे नाही. तालिबानी चिवट आणि लढाऊ आहेत. त्यांनी याआधी रशिया आणि अमेरिकेलाही चिवट झुंज दिली आहे त्यामुळे त्यांनी पाकिस्तानला गुडघे टेकवायला लावले तर आश्र्चर्य वाटायला नको. वास्तविक अफगाणिस्तानात जेंव्हा तालिबानचे सरकार आले तेंव्हा दोन्ही देशात सौहार्दाचे वातावरण होते मात्र अल कायदाचा मोठा दहशतवादी अल जवाहिरी पाकिस्तानात मारला गेला. अमेरिकेने त्याला पाकिस्तानात घुसून मारले. या सर्व कारवाईत पाकिस्तानने अमेरिकेला मदत केली असा आरोप तालिबानने केला आणि तेथून या दोन्ही देशातील संबंध बिघडले. त्यात पाकिस्तानने पाकिस्तानात राहणाऱ्या अफगाणिस्तानी नागरिकांना देशातून हाकलण्यास सुरवात केल्याने हा तणाव आणखी वाढला आता तर हा तणाव पराकोटीचा वाढला आहे. भारताचा काश्मीर प्रांत बळकावण्यासाठी तालिबानचा वापर करता येईल असे पाकिस्तानला वाटले होते त्याच तालिबानने आता पाकिस्तानचाच भूभाग बळकावून पाकिस्तानला चांगलेच तोंडघशी पाडले आहे. भारतासाठी खणलेल्या खड्ड्यात पाकिस्तानच गाढला जाऊ लागला आहे यालाच म्हणतात जैसी करणी वैसी भरणी!

## धनंजय मुंडे पालकमंत्री असताना वाल्मिक कराड घटनाबाह्य सत्ताकेंद्र

### अजितदादा गटातील आमदाराच्या आरोपाने भुवया उंचावल्या

नवी दिल्ली रु बीड येथील मस्साजोग गावचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने राज्याचे वातावरण चांगलेच तापले आहे. या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले याच्यासह सुधीर सांगळेला आज पुण्यातून ताब्यात घेण्यात आले आहे. एकूण सात आरोपींविरोधात केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. तर सरपंच संतोष देशमुखांच्या हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणीच्या गुन्ह्यातील आरोपी वाल्मिक कराड २२ दिवसांपासून बेपत्ता होता. तो ३१ डिसेंबर रोजी पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरण आला. या प्रकरणावरून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत आहे. आता राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी देखील धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

प्रकाश सोळंके म्हणाले की, बीड प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना अटक केलेली आहे. त्यामुळे आता देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळेल असं वाटतं. मात्र हा न्याय मिळेपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांना पदापासून दूर ठेवले पाहिजे, अशी मागणी मी केलेली आहे. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्या अशी मागणी मी अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेली आहे आणि जाहीर सभेतही या वर मी बोललेलो आहे, असे त्यांनी म्हटले.

धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्यावा

ते पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात निष्पक्षपातीपणे चौकशी करणार असल्याचं आश्वासन दिलं आहे, यावर माझा विश्वास आहे. आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. धनंजय मुंडे पालकमंत्री असताना वाल्मिक कराड घटनाबाह्य सत्ताकेंद्र होतं. त्यांनी खंडणी आणि किती खून केले? त्याचा तपास झाला पाहिजे. धनंजय मुंडे यांना कोणी वाचवत आहे, असं मला वाटत नाही. मात्र, त्यांचा राजीनामा हा घेतलाच पाहिजे. या प्रकरणामुळे बीडमध्ये मोठं सामाजिक ध्रुवीकरण झालं आहे, ते झालं नाही पाहिजे. यात जातीवाद न आणता जे गुन्हेगार आहेत, त्यांना शिक्षा झाली पाहिजे, असेही प्रकाश सोळंके यांनी म्हटले आहे.

परभणीत आज मूक मोर्चा

बीड येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांना तातडीने अटक करून फाशीची शिक्षा द्यावी, या मागणीसाठी आज परभणीत सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वधर्मीय मुक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता नूतन महाविद्यालय येथून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत हा मोर्चा निघाला आहे. या मोर्चामध्ये स्वर्गीय संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी तसेच भाऊ धनंजय देशमुख, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील, आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनवणे, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार संदीप शिरसागर, ज्योती मेटे यांच्यासह स्थानिक परभणी जिल्हा प्रतिनिधी, खासदार, आमदार उपस्थित आहेत.

## कियारा अडवाणी हॉस्पिटलाइज्डच्या घोषणेनं चाहते चिंतेत

**मुंबई/प्रतिनिधी :** राम चरण आणि कियारा अडवाणीची भूमिका असलेला 'गेम चेंजर' हा आगामी चित्रपट सध्या जोरदार चर्चेत आहे. या चित्रपटाचा ग्रँड प्री-इव्हेन्ट अमेरिकेत पार पडल्यानंतर जगभर या सिनेमाची हवा निर्माण झाली आहे. आता या चित्रपटाचा एक इव्हेन्ट मुंबईत सुरू असताना या कार्यक्रमाला कियारा अडवाणी हजर नव्हती याचं आश्चर्य उपस्थितांना वाटल्याशिवाय राहिलं नाही.

या कार्यक्रमाला कियारा उपस्थितीत का नाही याचा खुलासा होस्ट असलेल्या नितीन यानं केला. तो म्हणाला की, ''या इव्हेन्टला कियारा हजर राहू शकलली नाही कारण ती हॉस्पिटलाइज्ड आहे.'' यानंतर ही बातमी वाऱ्यासारखी पसरायला वेगळ लागला नाही. ती खरंच रुग्णालयात दाखल झाली आहे का?, तिला नेमकं काय झालंय? अशा शंका चाहत्यांच्या मनात तयार होत आहेत. त्यानंतर आम्ही या बातमीचा पाठपुरावा केला.

''कियारा अडवाणी हॉस्पिटलाइज्ड झालेली नाही. सतत काम करत राहिल्यामुळे तिला थकवा आला आहे आणि तिला विश्रांती घेण्याचा सल्ला मिळाल्यामुळं ती गेम चेंजरच्या इव्हेन्टला हजर राहू शकलेली नाही'', असं तिच्या पीआर टीमनं कळवलं आहे. 'गेम चेंजर'च्या मुंबई इव्हेन्टमध्ये चित्रपटाचे दिग्गज कलाकार, निर्माते हजर राहिलेले असताना कियारा गैरहजर राहिल्यानंतर होस्ट नितीन यानं ती हॉस्पिटलाइज्ड असल्याचं सांगितल्यामुळे चाहत्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता.

## तुम्ही पिझ्झा खात असाल तर सावध व्हा; पिझ्झामध्ये चाकूचा तुकडा, पिंपरी चिंचवडमधील धक्कादायक प्रकार

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** :लहान मुलं असो किंवा कोणीही, अनेक भाज्यांनी नटलेला पिझ्झा कोणालाही आकर्षित केल्याशिवाय राहत नाही. मात्र, हा पिझ्झा आपल्यासाठी धोकादायक ठरू शकतो. त्यामुळं जर तुम्ही पिझ्झा खात असाल तर सावध व्हा. कारण पिझ्झामध्ये अक्षरश: चाकूचा तुटलेला तुकडा आढळून आला आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील भोसरी परिसरातील इंद्रायणी नगरमध्ये डॉमिनोज पिझ्झामध्ये अक्षरश: चाकूचा तुटलेला तुकडा आढळून आला आहे. काल रात्री हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

नेमकं काय आहे प्रकरण?

इंद्रायणी नगरमध्ये राहणाऱ्या अरुण कापसे या व्यक्तीने आपल्या कुटुंबीयांसाठी काल रात्री जय गणेश साम्राज्य चौकातील डॉमीनोज पिझ्झा स्टोअर मधून ५९६ रुपये किमतीचा एक पिझ्झा ऑनलाइन ऑर्डर केला होता. पिझ्झा आल्यानंतर आपल्या कुटुंबीयांसोबत पिझ्झाचा आस्वाद घेत असताना, अरुण कापसे यांच्या दातात अक्षरश: पिझ्झा कट करणाऱ्या चाकूच्या तुटलेला तुकडा घुसला होता. अरुण कापसे यांनी आपल्या सोबत घडलेला प्रकार अतिशय धक्कादायक असल्याने त्यांनी लगेच डोमिनोज पिझ्झाच्या मॅनेजरला फोन करून घडलेला सर्व प्रकार सांगितला.

मात्र, सुरुवातीला त्यांना डोमिनोज पिझ्झाच्या मॅनेजरकडून उडवा उडवीची उत्तर देण्यात आली. मात्र मॅनेजरने घरी येऊन पिझ्झातील तुटलेला चाकूचा तुकडा बघितल्यानंतर त्याला देखील आश्चर्याचा धक्का बसला आहे. या सर्व प्रकारानंतर डॉमिनोज पिझ्झा कडून अरुण कापसे यांना त्यांच्या पिझ्झाच्या ऑर्डरचे पैसे लगेच परत करण्यात आले आहेत. मात्र, नागरिकांच्या आरोग्याशी, खेळ खेळणाऱ्या डॉमिनोज पिझ्झा विरोधात अरुण कापसे हे आज पुणे जिल्हा अन्न व औषध विभाग प्रशासनाकडे तक्रार करणार आहेत.










DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाले मुलाच्या खात्यावर; आई, मुलाने दाखवला प्रामाणिकपणा शासनाला पैसे केले परत

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** राज्यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या संदर्भात विविध माहिती समोर येत असताना धुळे तालुक्यातील नकाने गावातील एका महिलेचा आणि तिच्या कुटुंबाचा या योजनेतून प्रामाणिकपणा समोर आला आहे. नकाणे गावातील रहिवाशी असलेल्या मुलाच्या नावे असलेल्या योगित खैरनार यांच्या खात्यात पैसे जमा झाल्यानंतर सदर महिलेने आणि तिच्या मुलाने हे पैसे शासनाला जमा केल्याचा हा प्रकार समोर आला आहे.

धुळे तालुक्यातील नकाणे गावातील रहिवाशी असणाऱ्या भिकुबाई प्रकाश खेरणार यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी आपला अर्ज केला, मात्र हा अर्ज भरल्यानंतर संबंधित अर्जासाठी आधार कार्ड जोडताना भिकुबाई यांचे आधार कार्ड ऐवजी चुकुन त्यांच्या मुलाचे आधार कार्ड जोडले गेले होते. यामुळे काही दिवसातच त्यांच्या मुलाच्या नावे असलेल्या खात्यावर तब्बल साडेसात हजार रुपये जमा झाले होते, मात्र ही बाब लक्षात आल्यानंतर भिकुबाई यांच्या मुलाने हे पैसे आपल्या खात्यावर कसे आले याबाबत पडताळणी केली असता आपले आधार कार्ड त्याला जोडले गेल्याचा प्रकार त्याच्या लक्षात आला.

याबाबत खैरनार कुटुंबीयांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठत तात्काळ संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून हे पैसे परत करण्यासाठीची




प्रक्रिया पूर्ण केली. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी देखील याची तात्काळ दखल घेत त्यांच्याकडून कागदपत्रांची पूर्तता करून एका चलनाद्वारे खैरनार कुटुंबाला आलेले पैसे शासनाला जमा केले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी आपला अर्ज भरला जात असताना मुलाचे आधार कार्ड दिले गेल्यानंतर त्याच्या खात्यावर पैसे जमा झाले मात्र हे पैसे आपल्याला नको असे त्यांनी मला सांगितल्यानंतर आपण देखील हे पैसे परत करण्याबाबत सांगितले त्यानंतर माझे आधार कार्ड जोडून लाडकी बहिणी योजनेचा अर्ज भरल्यानंतर आता माझ्या खात्यावर पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे अशी प्रतिक्रिया भिकुबाई खैरनार यांनी यावेळी व्यक्त केली

मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजनेसाठी लाखो महिलांनी अर्ज केल्यानंतर आता त्याची शासनाकडून नियमावली देखील जाहीर करण्यात आली, मात्र अर्ज भरताना झालेल्या चुकीमुळे शासनाचे पैसे परत करण्याचा प्रामाणिकपणा भिकुबाई खैरनार यांनी दाखवला मात्र भिकुबाई खैरनार या अपात्र झाल्याने त्यांचे पैसे काढून घेण्यात आल्याचे वृत्त प्रसारित झाले होते.

## मुंबईतील प्रदूषण करणाऱ्या बांधकामांवर पालिका ठेवणार २४ तास वॉच

**मुंबई/प्रतिनिधी :** बोरिवली पूर्व, वरळी आणि भायखळा येथील हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झाल्यानंतर बांधकाम ाच्या ठिकाणांवरील निर्बंध उठवण्यापूर्वी पालिकेने २४ तास निरीक्षण करण्याचा निर्णय घेतलाय. मागील काही दिवसांपासून मुंबईतील हवेच्या गुणवत्तेत सातत्याने घसरण होत असल्याने पालिका प्रशासनावर मोठ्या प्रमाणात टीका होतेय. या पार्श्वभूम ीवर पालिकेने काही दिवसांपूर्वीच ७७ बेकऱ्या आणि २८६ बांधकामांना कामे थांबवण्याच्या नोटिसा जारी केल्या होत्या. यातील ७७ बेकऱ्या बंद करण्याचे आदेश पालिका प्रशासनाने दिले होते. पालिकेच्या निर्णयानंतर बोरिवली, वरळी, भायखळा या भागातील हवेच्या गुणवत्तेत वाढ झाल्याचे निदर्शनास आलेय. मात्र बांधकामांवरील निर्बंध उठवण्यापूर्वी या सर्व बांधकामांवर पुढील काही दिवस २४ तास वॉच ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतलाय.

मुंबईतील हवेच्या गुणवत्तेबाबत म हाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कठोर पावले उचलण्याची नोटीस बृहन्मुंबई म हानगरपालिकेला काही दिवसांपूर्वी पाठवली होती. त्यानंतर पालिका प्रशासन सक्रिय झाले होते आणि प्रदूषण करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना आणि बेकऱ्यांवर कारवाई करण्यास सुरुवात झालीय. वाहतूक कोंडी आणि मुंबईत मोठ्या प्रमाणात सुरू असलेली बांधकामं ही इथल्या प्रदूषणाचे मुख्य कारण आहेत. आज मुंबईतील बांधकामांचा विचार केला, तर साधारण अब्जावधी रुपयांची बांधकामे सध्या म ुंबईत सुरू आहेत. अशातच ज्या बांधकाम व्यावसायिकांना नोटिसा पाठवण्यात आल्यात. त्या बांधकामांवर लक्ष ठेवणे हे सध्या पालिकेसमोर मोठे आव्हान आहे.

पालिका प्रशासनाने धूळ, धूर प्रदूषणावर नियंत्रणासाठी आधीच २८ म ार्गदर्शक सूचना जारी केल्यात. पालिकेच्या पर्यावरण आणि वातावरण याबद्दल विभागाकडून सातत्याने या बांधकामांचा पाठपुरावा केला जातोय. पालिकेकडून सर्व प्रकारच्या प्रकल्प आणि बांधकामाच्या विकासक आणि कंत्राटदारांना पर्यावरण व्यवस्थापन योजना सादर करण्याच्या सूचना केल्यात. शिवाय जे कंत्राटदार आणि बिल्डर या नियमांचे पालन करणार नाहीत, त्यांना आधी सूचना, मग कारणे दाखवा नोटीस आणि शेवटी काम थांबवण्याच्या नोटिसा पाठवण्यात आल्यात.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास होतो : डॉ. प्रवीण वराडे



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** ३ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत शिबिराचे उद्घाटन ग्राम वरदडी बुद्रुक येथे आयोजित करण्यात आले उद्घाटकन डॉ .प्रवीण वराडे साहेब नायाब तहसीलदार सिंदखेड राजा यांच्या हस्ते करण्यात आले तसेच प्रमुख म्हणून लाभलेले भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव शिवराज भाऊ कायंदे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ .विजय नागरे (अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती) उपस्थिती तसेच दुसरबीड येथील सरपंच सौ. सरस्वती ताई मखमले तसेच दत्तक ग्राम वर्दडी खुर्द येथील श्री दत्तात्रय काकड (ग्रामपंचायत सदस्य वर्दडी ) श्री भुजंग साळवे (माजी ग्रामपंचायत सदस्य वर्दडी ) श्री विश्र्वास इंगळे (शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपती ) श्री भगवान वाघ (ग्रामपंचायत सदस्य वर्दडी) तसेच इतर प्रतिष्ठित नागरिक या उद्घाटनासाठी उपस्थित होते सह कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिकांना यांना गवारे प्राध्यापक शेख प्राध्यापक सत्यम श्रीवास्तव तसेच मोठ्या संख्येने महाविद्यालयातील प्राध्यापक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी व महाविद्यालयातील स्वयंसेवक कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## कांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त मेगा होमिओपॅथी शिबिराचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जागतिक महिला सक्षमीकरणाची जननी व शिक्षणक्रांतीच्या अग्रदूत असलेल्या कांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून श्री होमिओपॅथी रुग्णालयात भव्य होमिओपॅथी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिक व समाजसेवक श्री. रतन नरवडे सर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीने शिबिराला एक आगळावेगळा रंग चढला.

या शिबिरात एकूण ५० रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. रुग्णांना १५ दिवसांचे मोफत होमिओपॅथी औषध वाटप करण्यात आले. याशिवाय, रुग्णांसाठी लॅब चाचण्यांवर ५०% सवलत देण्यात आली, ज्यामुळे अनेकांना परवडणाऱ्या दरात उपचार घेण्याची संधी मिळाली.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. समीर काळे (एम.डी.), व टीम डॉ के डी हरणे एमडी ,डॉ. श्र्वेता बैस (बी.एच.एम.एस.), तसेच स्टाफ श्री. विकास जामधडे आणि श्री.



कुलदीप जामधडे यांनी अथक परिश्रम घेतले. या शिबिरात रुग्णांच्या आरोग्य समस्यांचे निराकरण करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावी उपचार करण्यात आले.

या शिबिरामुळे ग्रामीण भागातील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना उत्तम आरोग्यसेवा मोफत व सवलतीत उपलब्ध करून दिली गेली. रुग्णांनी श्री होमिओपॅथी रुग्णालयाच्या या सामाजिक उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. भविष्यातही असे उपक्रम राबवावे, अशी अपेक्षा उपस्थित रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केली.

शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल श्री होमिओपॅथी रुग्णालयाच्या संपूर्ण टीमचे कौतुक होत आहे. समाजासाठी अशा प्रकारच्या आरोग्य उपक्रमांची नितांत गरज आहे, असे मत उद्घाटक श्री. रतन नरवडे सर यांनी व्यक्त केले.

## बीड प्रकरणावर रोहित पवारांची मोठी प्रतिक्रिया, 'त्या' व्हायरल फोटोबाबत म्हणाले...

**पुणे/प्रतिनिधी :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे. २४ डिसेंबरला धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड याने सीआयडीकडे सरेंडर केल्यानंतर आता पोलिसांनी या प्रकरणातीन दोन मुख्य आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. देशमुख यांच्या खून प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना बीड पोलिसांच्या विशेष पथकाने पुण्यातून बेड्या ठोकल्या आहेत. या सगळ्यावरून वाल्मिक कराड आणि इतर आरोपींचे धनंजय मुंडे यांच्याशी संबंध असल्याचा आरोप केला जातोय. याबाबतचे त्यांचे काही फोटोही समोर आले आहेत. शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे यांचाही आरोपींसोबतचा फोटो समोर आला आहे.

या सगळ्या प्रकरणावर आता शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी अशाप्रकारे व्हायरल झालेल्या आरोपींसोबतच्या फोटोंवर भाष्य केलं आहे. अशाप्रकारे जुने फोटो व्हायरल करणं आणि त्याच्याशी गुन्ह्याशी लिंक करणं योग्य नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे. ते पुण्यात पत्रकारांशी संवाद साधत होते.

## संतोष देशमुखांच्या हत्येचे नवे कनेक्शन समोर, जितेंद्र आव्हाडांनी निवडणुकीतील 'तो' मुद्दा बाहेर काढला

**बीड/प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्या प्रकरणात दररोज नवीन धक्कादायक माहिती समोर येत आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी प्रकरणी वाल्मिक कराड तुरुंगात आहे. देशमुखांची हत्या करणारे आरोपी कराडशी संबंधित आहेत. त्यामुळे कराडच या हत्येचा मास्टरमाईंड असल्याचा आरोप होत आहे. सीआयडीने वाल्मिक कराडचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार यांनी मोठा दावा केला आहे. संतोष देशमुखांची हत्या इलेक्शन फंडमुळे झाली, असा दावा जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले, इलेक्शन फंडमुळे महाराष्ट्रात झालेली जी काही लफडी त्याच्यातली बीडचे प्रकरण एक आहे. संतोष देशमुख प्रकरण बीडच आहेत ते इलेक्शन फंडाचे आहेत. जी काही दोन कोटीची वसुली आहे. ती इलेक्शन फंडाची वसुली आहे.

तीन आरोपी फरार

संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणातील तीन आरोपी फरार आहेत. या तिन्ही आरोपींचा शोध सुरू आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे हे तीन आरोपी फरार आहेत. ल्मिक कराडसाठी हे काम करत असल्याचे म्हटले जात आहे. आता या प्रकरणातील खंडणीचा गुन्हा दाखल असलेला वाल्मिक कराड हा सीआयडीसमोर शरण आला. त्यानंतर आता या मुख्य आरोपींचा शोध सुरू झाला आहे. या प्रकरणातील मुख्य तीन आरोपींना पोलिसांनी मोस्ट वॉन्टेड म्हणून घोषित केले आहे.

काय आहे खंडणीचे प्रकरण?

मस्साजोग येथील आवादा एनर्जी प्रकल्पाच्या कार्यालयात २९ नोव्हेंबरला विष्णू चाटे यांनी फोन करत वाल्मीकअण्णा बोलणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी प्रकल्पाचे काम बंद करण्याबाबत धमकी दिली. तसेच दुपारी सुदर्शन घुले याने कार्यालयात जात पुन्हा काम बंद करण्याची धमकी दिली.




## विविध वृत्त...

### प्रत्येक गोष्टीच राजकीय भांडवल करायचे नसतं; बीड प्रकरणावरून मंत्री आशिष जयस्वाल यांचा विरोधकांना टोला



दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग चे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणांमध्ये महायुतीचे नेते धनंजय मुंडे यांच्या राजीनामाची मागणी विरोधकांकडून करण्यात आली होती. यावरून बोलताना शिवसेना शिंदे गटाचे नेते आशिष जयस्वाल यांनी विरोधकांना टोला लगावला असून प्रत्येक गोष्टीच राजकीय भांडवल करायचा नसतं, बीड प्रकरणांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः गृहमंत्री असून ते जो कुणी आरोपी असेल त्याच्यावर कठोर कारवाई करतील अशी प्रतिक्रिया आशिष जयस्वाल यांनी दिली आहे.

### बुलढाण्यात पोलीस वर्धापन दिनानिमित्त पोलीस विभागाकडून विविध कार्यक्रम




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिनित्त २ जानेवारीपासून बुलढाणा शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज शहरातील जयस्तंभ चौकात पोलीस बँड पथकाकडून विविध गीत सादर करण्यात आले आहे. तर २ ते ८ जानेवारीपर्यंत हा सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. तर ८ जानेवारीपर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.. या विविध कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन बुलढाणा शहरचे ठाणेदार नरेंद्र ठाकरे यांनी केले आहे.

### विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मनपा झोन क्रमांक दोन ला दिली भेट



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** संभाजीनगर महानगरपालिका झोन क्रमांक २ येथील कार्यालयात आज प्रत्यक्ष जाऊन नागरी समस्यांचे निवारण विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केलं. नागरिकांच्या समस्या, प्रश्र्न व अडीअडचणी ऐकून घेत मार्गी लावल्या. वॉर्ड क्रमांक ५६, संजयनगर येथील रहिवाशी मुक्ताबाई राठोड यांचे मागील चार वर्षांपासून प्रलंबित टॅक्सचा प्रश्र्न जागेवरच सोडविला. तसेच वार्ड अधिकारी यांनी दररोज झोन अंतर्गत येणाऱ्या कार्यक्षेत्रात भेटी देऊन सर्व नागरी सोयीसुविधांवर लक्ष द्यावे, अशा सूचना यावेळी केल्या.

याप्रसंगी सहसंपर्कप्रमुख त्र्यंबक तुपे, महानगरप्रमुख राजू वैद्य,उपजिल्हाप्रमुख संतोष जेजुरकर,आनंद तांदूळवाडीकर, लक्ष्मीनारायण बखारिया, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, विधानसभा संघटक दिग्विजय शेरखाने,मोहन मेघावाले, राजेंद्र दानवे, महिला आघाडी जिल्हा संघटक आशा दातार, महानगर संघटक मीना फसाटे व शहर संघटक सुनिता सोनवणे उपस्थित होते.